**नि. फौ. ख. क्र.१२६/२००८**
सरकार **विरूध्द** सुरेश बिरामणे वगैरे

## <u>आदेश निशाणी क्रमांक ३६१ वरील</u>

आरोपी क्र. ७ श्री.धर्मराव बाबा भगवतराव आत्राम याने प्रस्तुतचा अर्ज त्याला परदेशी जाणेसाठी व दि. ०५/११/२०२१ ते दि. ०१/०५/२०२२ या कालावधीमध्ये प्रस्तुत खटल्याचे कामी गैरहजर राहण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत गुहयाचे कामी प्रस्तुत आरोपीला अटक करण्यात आली होती. परंतु, मा. जिल्हा न्यायाधीश, पुणे यांचे आदेशानुसार सदर आरोपीची जामिनावर मुक्तता करण्यात आली असून सन २००८ पासून आरोपी जामिनावर खुले आहेत. अर्जदार आरोपीच्या म्हणण्यानुसार आरोपी हे सामाजिक जीवनाशी निगडीत असल्याने त्यांच्या गडचिरोली जिल्हयामध्ये विविध प्रकारच्या शैक्षणिक व सामाजिक संस्था आहेत. सदर संस्थांच्या कारभारासाठी नवीन तंत्रज्ञान शिकण्यासाठी प्रस्तुत आरोपी यांना इटली, स्पेन, जर्मनी, स्वित्झर्लंड, फ्रान्स, पोर्तुगल, नेदरलॅड, ऑस्ट्रिया, दुबई, क्रोएशिया आणि चेक रिपब्लिक या ठिकाणी जाणेकामी व देशातून गैरहजर राहणसाठी न्यायालयाच्या परवानगीची आवश्यकता आहे. आरोपी यांचे पासपोर्टचा वैध कालावधी दि. १८/०६/२०१८ ते १७/०६/२०२० असा होता. तसेच आरोपी यांचे कायमचे वास्तव्याचे ठिकाण ‘‘राजवाडा’’ आहेरी, जि. गडचिरोली महाराष्ट्र असून ते सदर ठिकाणी पुर्वजांपासून राहत आहेत. आरोपीच्या म्हणण्यानुसार त्यास देशाबाहेर जाण्याची परवानगी मिळाल्यानंतर त्यांचेकडून कायद्याचे व जामिनाच्या अटींचे उल्लंघन होणार नाही व त्याबाबतचा न्यायालयाचा आदेश पाळील. सबब, आरोपीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

**२.** सदर अर्जास सरकारी वकीलांनी म्हणणे दिलेले असून त्यांनी असे नमूद केलेले आहे की, कोरोना प्रादुर्भावामुळे देशाबाहेर जाण्याची परवानगी देणे आवश्यक नाही. अर्जात नमूद केल्याप्रमाणे ज्या देशात आरोपी क्र. ७ जाउ

इच्छित आहे त्या देशात भारतातून येणा—या नागरिकांना कोरोना विषाणूमुळे बंदी केलली आहे. तसेच आरोपीच्या हेतू देशाबाहेर पळून जाण्याचा दिसून येत आहे. त्यामुळे आरोपीचा अर्ज फेटाळण्यात यावा. प्रस्तुत अर्जावर चौकशी अधिकारी यांनी कोणतेही म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या म्हणण्याशिवाय चालविण्यात येतो.

**३.** प्रस्तुतचा खटला आरोपी विरुध्द वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ चे कलम ९, ३९, ४०, ५०, ५१, ५२ तसेच भारतीय वन अधिनियम १९२७ कलम २६ (आय) अन्वये सध्या प्रलंबित आहे. आरोपीच्या म्हणणेनुसार आरोपी हे सामाजिक जीवनाशी निगडीत असल्याने त्यांच्या गडचिरोली जिल्हयामध्ये विविध प्रकारच्या शैक्षणिक व सामाजिक संस्था आहेत. सदर संस्थांच्या कारभारासाठी नवीन तंत्रज्ञान शिकण्यासाठी प्रस्तुत आरोपी यांना इटली, स्पेन, जर्मनी, स्वित्झर्लंड, फ्रान्स, पोर्तुगल, नेदरलॅड, ऑस्ट्रिया, दुबई, क्रोएशिया आणि चेक रिपब्लिक या ठिकाणी जाणेकामी व देशातून गैरहजर राहणेसाठी न्यायालयाच्या परवानगीची आवश्यकता आहे. आरोपी त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक संस्थेचे कामानिमित्त दि. ०५/११/२०२१ ते ०१/०५/२०२२ या कालावधीसाठी वर नमूद देशात जाणार आहे. तेथून ते देशामध्ये परत येणार आहे. आरोपीने सदरचा अर्ज प्रतिज्ञापत्रासोबत दाखल केला आहे. तसेच आरोपीने प्रतिज्ञापत्रात असे नमूद केले आहे की, ते जामिनाच्या अटी व शर्तीचे पालन करतील व कायद्याचे उल्लंघन करणार नाही. त्यामुळे आरोपीस परदेशात जाणेस नाहरकत दिल्यास सरकार पक्षाचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउपरांत सरकार पक्षाने घेतलेल्या आक्षेपांचा विचार करता आरोपीस परदेशात जाणेसाठी अटींवर परवानगी देणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** आरोपी क्रमांक ७ श्री. धर्मराव बाबा भगवंतराव आत्राम याला

परदेशात जाण्यास परवानगी देण्यात येत आहे.

**२.** परदेशात जाण्याची परवानगी मिळाल्यानंतर आरोपीने त्याचा कोणत्याही प्रकारे दुरूपयोग करू नये तसेच कायद्याचे उल्लंघन करू नये.

**३.** परदेशातून आल्यानंतर आरोपीने न्यायालयात हजर रहावे.

**सही/—**

**(श्रीमती डी. एम. पाटील)**

२रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

सासवड.

दिनांक २९/१०/२०२१

ठिकाण:—सासवड.

# -: C E R T I F I C A T E :-

"I affirm that the contents of this P.D.F. file order are same word for word as per original order".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer (Grade 3) | : | Mrs. S. R.Kamble |
| Name of the P. O. | : | Smt. D. M. Patil, 2nd Jt. C.J.J.D & J.M.F.C., Saswad. |
| Date of Order | : | 29/10/2021 |
| Order signed by presiding officer on | : | 29/10/2021 |
| Order uploaded on | : | 30/10/2021 |